अफरातफरीच्या/अपहाराच्या प्रकरणी त्वरित
निकाली काढणेबाबत--------

पोलीस खात्याकडे प्रलंबित असणारी प्रकरणे.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसीएम-१०८९/३१३९/सीआर-१७००/ई-५,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १७ ऑक्टोबर, १९८९.

## परिपत्रक

महसूल विभागातील तसेच भूमी अभिलेख विभागातील शासकीय कर्मचा-यांनी शासकीय रकमेचा तसेच मालमत्तेचा अपहार केल्याची प्रकरणे विभागीय आयुक्तांच्या / शासनाच्या निदर्शनास आणण्यात येतात. अशा प्रकरणांमध्ये अपचारी शासकीय कर्मचा-यांविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करणे आवश्यक असते. अफरातफरीची अशी बहुसंख्य प्रकरणे आवश्यक त्या चौकशीसाठी व फौजदारी न्यायालयात खटला दाखल करण्याचे दृष्टीने पोलीस खात्याकडे पाठविण्यात येतात. पोलीस खात्याकडे अशी, अफरातफरीच्या चौकशीबाबतची प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित रहातात त्यामुळे अपचा-यांविरुद्ध सुरु करण्यात येणा-या विभागीय चौकशीमध्ये तसेच कोर्टामध्ये दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणी निर्णयास विलंब होतो. काही प्रकरणामध्ये अपचारी कर्मचा-यांस निलंबित करण्यात येते. त्यामध्ये संबंधित निलंबित कर्मचा-यांस अंतिम निर्णय होईपर्यंत निलंबन भत्ता देणे भाग असते. प्रकरणे दीर्घ कालावधीकरीता प्रलंबित राहिल्या कारणाने निलंबित कर्मचा-यांस देण्यात येणा-या निलंबन भत्या-पोटी शासनास मोठा खर्च सोसावा लागतो.

२. अफरातफरीची अशी प्रकरणे अत्यंत शीघ्र गतीने निकाली काढणे हे आवश्यक आहे असा शासनाचा दृष्टिकोन आहे. त्या दृष्टीने शासन पुढील सूचना देत आहे :-

"अफरातफरीची जी प्रकरणे, पोलीस खात्यात चौकशीसाठी ६ महिन्या-पेक्षा जास्त काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांचा, संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे, महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आढावा घ्यावा व प्रलंबित प्रकरणे पोलीस आयुक्त/अधीक्षक पोलीस यांचे निदर्शनास आणावीत व ती प्रकरणे व विशेषत: दीर्घ काळ प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
25 OCT 1989
बारनिशी - 1351
प्र.लि. नि.उ.लि. जिल्हाधिकारी
43/1e

कृ.मा.प.

तत्कर निकाली आदण्याच्या दृष्टीने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून त्याचा पाठपुरावा करण्यात यावा. प्रलंबित प्रकरणांचा हा आढावा दर तीन महिन्यांनी घेण्यात यावा. येणे करुन पोलीस खात्याकडील अशा अकृषकांच्या प्रलंबित प्रकरणात होणारा विलंब कमी होऊन सदरहू प्रकरणे लवकर निकाली निघु शकतील.

३. हे परिपत्रक गृह विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ तु.श्री. खाते ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

प्रत,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. महानिरीक्षक नोंदणी व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त परिपत्रक त्यांचे अधिनस्त कार्यालयांचे निदर्शनास आणावे.
५. गृह विभाग [पोल-१३], मंत्रालय, मुंबई-३२.
६. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. निवड नस्ती, ई-५, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

क्रमांक : आस्थापना-२-४०७
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी २० -१२-१९८८.

दिनांक २०।१२।८ पाठविले

लिपिक

प्रत उप विभागीय अधिकारी, खेड/चिपळूण/रत्नागिरी यांच्याकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.